संक्षिप्त फौ.ख.क्र.१७५४/२०२१
नि.क्र. १४ लगत

(प्रकरणामध्ये स्टे नाही असे उभयपक्षाचे वकीलांनी कथन केले आहे म्हणून पुढील सरतपास शपथेवर सुरु. हिंदी मधुन मराठी अनुवाद )

**फिर्यादीतर्फे सा. क्र.१ विनोद हर्बन्सलाल वर्मा यांचा शपथेवर पुढील सरतपास फिर्यादीतर्फे विधीज्ञ श्री यादव यांच्या मार्फत –**

१. मी चेक बाऊंसची केस आरोपीविरूध्द दाखल केलेली आहे. (नि.क्र.१६/१ सोबत दाखल असलेले ७ चेक साक्षीदारास दाखवण्यात आला.) आता मला दाखविलेला चेक आरोपीने लिहिलेला असून तो मला देण्यात आला होता. त्यावरील सही मी ओळखतो. आरोपीची सही आहे. त्यातील लिहिलेला मजकुर बरोबर आहे. मुळ चेकची ही प्रत मी दाखल केली आहे. (मुळ चेकची प्रत असल्याने सदर चेकला **नि.क्र.पी– २१/पी.डब्ल्यू.१** देण्यात येते.)

२. मी सदरचे चेक बँकमध्ये दाखल केले असता ते न वटता परत आले. इनसफिसिअंट फन्ड त्या कारणाने. मला मेमो देण्यात आले. (नि.क्र.१६/२ वर दाखल केलेले कागदपत्र साक्षीदारास दाखवण्यात आले.) हा तोच मेमो असून त्यावर बँकेचा शिक्का व सही आहे. मूळप्रत मी दाखल केली आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. (मुळ प्रत असल्याने सदर मेमोला **नि.क्र.पी– २२/पी.डब्ल्यू.१** देण्यात येते.)

३. मेमो मिळाल्याने मी आरोपीला वकीलांमार्फत नोटीस पाठविली. (नि.क्र.१६ सोबत दाखल केलेले कागदपत्र साक्षीदारास दाखवण्यात आले.) आता मला दाखवलेली नोटीस मी ओळखतो. त्यावर माझी व वकील श्री.विकास पाटील यांची सही आहे. यातील मजकुर बरोबर आहे. आरोपीला वकीलांमार्फत नोटीसची स्थळप्रत दाखल केली आहे. (सदर नोटीसला **नि.क्र.पी– २३/पी.डब्ल्यू.१** देण्यात

येते.). नोटीस रजिस्टर पोस्टोने पाठवले. मला दाखवलेली पोस्टाची पावती मूळ प्रत मी ओळखतो. मी पोस्टामार्फत नोटीस पाठवली त्याबद्दलची पावती आहे. (सदर मुळ पावतीला **नि.क्र.पी– २४/पी.डब्ल्यू.१** देण्यात येते.).

४ सदरची नोटीस परत आली. (नि.क्र.१६ सोबत दाखल केलेला बंद लखोटा व आरपीएडी कार्ड साक्षीदारास दाखवण्यात आले.) आता मला दाखविलेला लखोटा व पोस्टाचे कार्ड मी ओळखतो. सदरचा लखोटा आरोपीने न घेतल्याने परत करण्यात आला. (सदरच्या लखोटयाला **नि.क्र.पी– २५/पी.डब्ल्यू.१** देण्यात येते. सदर कार्डाला **नि.क्र.पी– २६/पी.डब्ल्यू.१** देण्यात येते.) (नि.क्र.१६ सोबत दाखल केलेले कागदपत्र दाखवण्यात आले.) आता मला मी दाखविलेले कागदपत्र मी ओळखतो. बँकेतून माझ्या स्टेटमेंटची सही शिक्क्याची प्रत आहे.(बँकर्स बूक इव्हीडन्स ॲक्ट प्रमाणे **नि.क्र.पी– २७/पी.डब्ल्यू.१** देण्यात येते.)

**सरतपास पूर्ण. उलटतपास आरोपीतर्फे वकीलांच्या विनंतीवरून कॉस्टवर तहकूब .**

श्रवणोत्तर स्वीकृत

सही/–

**(श्रीमती पी.एस.जी.चाळकर)**

दि. ०८/०७/२०२५ २रे न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,पालघर

(वरील परीच्छेद ४ असावे वकिलांसमक्ष व साक्षीदारासमक्ष कळविण्यात आले )

PALLAVI SURYAKANT GOURI CHALKAR
Digitally signed by PALLAVI SURYAKANT GOURI CHALKAR
Date: 2025.09.25 17:21:07 +0530

**(श्रीमती पी.एस.जी.चाळकर)**

दि. २५/०९/२०२५ २रे न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,पालघर

संक्षिप्त फौ.ख.क्र.१७५४/२०२१
नि.क्र. १४ लगत

(प्रकरणामध्ये स्टे नाही असे उभयपक्षाचे वकीलांनी कथन केले आहे म्हणून पुढील उलटतपास शपथेवर सुरु. हिंदी मधुन मराठी अनुवाद )

**फिर्यादीतर्फे सा. क्र.१ विनोद हर्बन्सलाल वर्मा यांचा शपथेवर उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री पाटील यांच्या मार्फत –**

५. मी हर्बन्स पंजाब ढाब्याचा मालक आहे हे दाखवणारे कागदपत्र केसकामी दाखल नाही कारण ते माझ्याकडे मागण्यात आलेले नाही. पुढील तारखेपर्यंत मी ते कागदपत्र दाखल करण्यास तयार आहे. सदरचा ढाबा हा मी भाडयावर घेतलेला आहे व तो मी आजही चालवतो. हे म्हणणे खरे नाही की, मी हर्बन्स ढाब्याचा मालक नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिज्ञापत्रात पान क्रमांक २ वर परीच्छेद क्रमांक १ वर नमुद असलेला दिनांक २१.०४.२०१८ चे कागदपत्र मी केस कामी दाखल केलेले नाही. सदरचे २१.०४.२०१८ चे कागदपत्र अस्तीत्वात नाही, हे मला लक्षात नाही.

६. प्रशन – तुम्हाला सदरचा करार लक्षात नाही म्हणजे त्या करारा संदर्भात तुम्हाला कोणताही चेक मिळालेला नाही ?
उत्तर – त्यांनी पहिला चेक दिला होता व तो फेल झाला म्हणून त्यांनी दुसरा चेक दिला तो देखिल फेल झाला.

७. प्रशन – सदरचे चेक तुम्हाला कुठल्याही करारा (Agreement) संदर्भात दिले नव्हते ?
उत्तर – नाही, सदरचे चेक (Agreement) कराराप्रमाणेच दिले होते.

८. प्रशन – पुराव्याच्या प्रतिज्ञापत्रात परीच्छेद क्रमांक ३ मध्ये नमुद असलेला पाच वर्षाचा करार तुम्ही केस कामी दाखल केलेला नाही ?
उत्तर – आरोपीने मला अजूनपर्यंत कॉपी दिलेली नाही ती कॉपी त्यांच्याकडेच असावी.

९. सदरची जागा मी तीन ते चार महिने बार साठी वापरली. बारचा लायस्नस आरोपीच्या नावे आहे. हे म्हणणे खरे आहे की, यापूर्वी देखिल मी वेगवेगळया मिळकती भाडेकरारावर घेतलेल्या आहेत. त्या भाडेकरारांचा झेरॉक्स प्रत माझ्या कडे आहेत.

१०. आरोपी व माझ्या मध्ये कुठलाही भाडेकरार झाला नाही म्हणून सदरची प्रत माझ्याकडे नाही, या बद्दल मला माहित नाही.

११. प्रशन – हर्बन्स पंजाब ढाब्याचा मालक कोण आहे ?
उत्तर – जागा कोणा दुस–याची आहे पण मी ती भाडयावर घेतली आहे

म्हणून मी मालक आहे.

१२. (साक्षीदार यांना नि.क्र.२७ वरील आय.सी.आय.सी.आय बँकेचा स्टेटमेंट दाखवण्यात आले )

प्रशन – त्या स्टेटमेंट वर तुमचे नाव विनोद हर्बन्सलाल वर्मा म्हणून नमुद नाही ?

उत्तर – माझे नाव नाही. ढाब्याचे नाव नमुद आहे चेक ढाब्याचेच नावे दिले होते म्हणून ते त्या अकाउंट मध्ये टाकण्यात आले.

१३. (साक्षीदार यांना नि.क्र.२२ वरील चेक रीटर्न मेमो दाखवण्यात आला )

हे म्हणणे खरे आहे की, त्यावर आयसीआयसीआय बँक शाखा वापी असे नमुद आहे. साक्षीदार स्वतःहुन सांगतात की, कोरोना असल्यामुळे मी चेक बोईसरला डीपॉझीट केला होता परंतु तो क्लॅयरींगसाठी वापी येथे पाठवण्यात आला असे मला बँक वाल्याने सांगितले. हे म्हणणे खरे नाही की माझा अकाउंट वापीला आहे बोईसरला नाही.

१४. प्रशन – चेक डीपॉझीट करतानाची कोणतीही रीसीप्ट तुम्ही केस कामी दाखल केली आहे का व करु शकता का ?

उत्तर – चेक असाच टाकला होता रीसीप्ट नव्हती.

१५. हे म्हणणे खरे नाही की, चेक डीपॉझीट न केल्याने माझ्याकडे रीसीप्ट नाही.

१६. (साक्षीदार यांना नि.क्र.२१ वरील चेक दाखवण्यात आला.) हे म्हणणे खरे आहे की, हर्बन्स पंजाब ढाबा तर्फे मालक हर्बन्सलाल वर्मा असा लिहिलेला कोणताही चेक मला देण्यात आला नाही.

१७. हे म्हणणे खरे आहे की, त्या चेकवर देयक, रक्कम व अंकामध्ये नमुद असलेली रक्कम याच्या शाईत फरक आहे. साक्षीदार स्वतःहुन सांगतात की आरोपीने तो चेक मला दिला आणि त्याच्या समोरच मी तो भरला. हे म्हणणे खरे नाही की, सदरची नाव आणि रक्कम मी कोणाच्या सांगण्यावरुन भरलेले नाही.

१८. आरोपी हा व्ही.व्ही बारचा मालक आहे हे दाखवणारा ॲग्रीमेंट वगळून कोणतेही कागदपत्र केसकामी दाखल असावे. (साक्षीदार यांना मुळ संचिका दाखवण्यात आली. ) तसे कागदपत्र मी वकिलांना दिले असावे, कदाचित केस मध्ये नसावे, बराच वेळ निघून गेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदरचे कागदपत्र माझ्याकडे नाही आहे म्हणून मी ते केस कामी दाखल केले नाही.

१९. दाखल करताना मी माझे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र वाचले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, ते मराठीत असल्याने त्यातील एकही शब्द मला समजून येत नाही. हे

म्हणणे खरे नाही की, प्रतिज्ञापत्र दाखल करताना त्यात काय नमूद आहे हे मला कोणीही सांगितले नाही. साक्षीदार स्वतःहुन सांगतात की, वकिलांनी मला ते समजावून सांगितले होते. (साक्षीदार यांना पुराव्याचे प्रतिज्ञापत्र दाखवण्यात आले. ) हे म्हणणे खरे नाही की, त्यात परीच्छेद क्रमांक ४ मध्ये नमूद असलेला चेक क्रमांक १३३४६८ माझ्याकडे कधीही नव्हता व तो मी कधीही परत केला नाही. साक्षीदार स्वतःहुन सांगतात की तो चेक दिला होता व तो न वटता परत आला होता माझ्याकडे पूर्ण रेकॉर्ड आहे. पहिल्या चेकचा मी काहीही केसकामी दाखल केले नाही व वकिलांना दिले नाही. हे म्हणणे खरे नाही की, असा कोणताही चेक नव्हता. साक्षीदार स्वतःहुन सांगतात की, सदर चेक मेमो माझ्याकडे आहे. मी बँकेतुन रेकार्ड काढून देऊ शकतो.

२०. हे म्हणणे खरे आहे की, माझी व आरोपीची ब–याच वर्षापासून ओळख आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे आमच्यात ब–याचदा व्यवहार झाला आहे. हे म्हणणे खरे नाही की, व्यवहारामुळे त्यांचे चेक माझ्याकडे आणि माझे चेक त्यांच्याकडे असे होत होते. बोईसर येथे राहणारे राजु कारु यादव यांना मी ओळखत नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने माझ्याविरुध्द बोईसर पोलीस स्टेशनला तक्रार केली आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्या तक्रारीवरुन मी कधीही बोईसर पोलीस स्टेशनला गेलो नाही. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी माझी त्या बद्दल कोणतीही स्टेटमेंट घेतली नाही.

२१. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिज्ञापत्रात पान क्रमांक २ वर परीच्छेद अनुक्रमांक ३ मध्ये नमूद असलेला मजकुर हा आरोपीकडून मला १४,५०,०००/– रुपये येणे बाकी होते त्यातील दहा लाख रुपये त्यानी दिले व साडे चार लाख रुपये देणे बाकी होते या बद्दल कोणताही कागदोपत्री पुरावा मी दाखल केला नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी व माझ्या मधील व्यवहारात कोणही साक्षीदार नव्हता. साक्षीदार स्वतःहुन सांगतात की, आरोपीचा एक मित्र रमाकांत यादव यांनी बोलणी करुन दिली होती. गरज भासली तर रमाकांत यादवला साक्षीदार म्हणून या केसकामी सादर करेन. परीच्छेद क्रमांक ४ मध्ये नमूद असलेले चेक नंबर १३३४६८ व १६०७१८ या दोघांच्या सिरीज वेगळया आहेत का या बद्दल आरोपी सांगु शकतो कारण त्याने ते दिले होते. दोन्हीही चेक वेगवेगळया बँकेचे होते. पहिला चेक कदाचित युनायटेड बँकचा होता. हे म्हणणे खरे नाही की, माझ्याकडे आरोपीसोबत असलेल्या व्यवहारातील आरोपीचा असलेला दुसरा चेक मी केसकामी चूकिच्या पध्दतीने खोटी केस करण्यासाठी वापरला.

२२. मी इन्कम टॅक्स रीटर्न भरतो. सन २०१८–१९ मध्ये व २०२०–२१ मधील आयटी रीटर्न मध्ये मी त्या ४,५०,०००/– रुपये आरोपीकडून बाकी होते या बद्दल नमूद केले आहे का हे मला सांगता येणार नाही. कोर्टाला लागत असेलतर मी आयटी रीटर्न पुराव्याकरीता फाईल करीन. सदरचा व्यवहार मी त्यात दाखवला नाही

म्हणून मला आयटी रीटर्न केसकामी दाखल करता येणार नाही याबद्दल मला आता माझ्या लक्षात नाही. हे म्हणणे खरे आहे की, आयटी रीटर्न सीएला दाखवले जाते व मग ती फाईल केली जाते. हे म्हणणे खरे आहे की, माझा सर्व व्यवहार मी सीएला दाखवतो व तो ते आयटी रीटर्न मध्ये दाखवतो. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीसोबतचा व्यवहार कायदेशीर नाही (illegal आहे) म्हणून मी तो आयटी रीटर्न मध्ये देखिल दाखवला नाही.

२३. हे म्हणणे खरे नाही की, केस फाईल करण्यापूर्वी मी आरोपीला कुठलीही नोटीस पाठवली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीला कुठलीही नोटीस पाठवली नाही व ती तिला मिळाली नाही.

२४. हे म्हणणे खरे नाही की, राजु कारु यादव सोबत षडयंत्र करुन खोटया चेक मार्फत मी आरोपीविरुध्द खोटी केस दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, केस सादर करण्यापूर्वी आरोपीसोबत माझे फोनवर बोलणे झाले होते की, मुद्दल बाकी नाही पण इंटरेस्ट बाकी आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाकारला.**

श्रवणोत्तर स्वीकृत

PALLAVI SURYAKANT GOURI CHALKAR

Digitally signed by PALLAVI SURYAKANT GOURI CHALKAR
Date: 2025.09.25 17:21:19 +0530

**(श्रीमती पी.एस.जी.चाळकर)**

दि. २५/०९/२०२५

२रे न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,पालघर